# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.०२/०२/२०२४

**वसईत सोमवार पासून 'विकसित भारत संकल्प' यात्रेचा दुसरा टप्पा,
विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याची वसईकरांना संधी**

केंद्र शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'विकसित भारत संकल्प' यात्रेचा दुसरा टप्पा येत्या सोमवार पासून सुरू होणार आहे. ५ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२४ या काळात वसई विरार शहरातील ९ प्रभागात ही यात्रा फिरणार आहे. नोव्हेंबर महिन्यात वसईत सुरू झालेल्या या यात्रेच्या पहिल्या टप्प्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे योजनेचा दुसरा टप्पा आयोजित करण्यात आला आहे.

केंद्राच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवून त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी 'विकसित भारत संकल्प यात्रा' या मोहीमेचे आयोजन करण्यात आले आहे. २८ नोव्हेबर ते २२ डिसेंबर २०२३ या कालावधीत या योजनेचा पहिला टप्पा महानगरपालिका क्षेत्रात सुरू झाला होता. पहिल्या टप्प्यात शहराच्या ९ प्रभागातील ४९ शिबिरांमध्ये २० हजारांहून अधिक नागरिक उपस्थित होते. त्यात ९ हजार ३४० पुरूष तर १० हजार ८९३ महिलांचा समावेश होता. तर हजारो नागरिकांनी विविध योजनांचा लाभ घेतला होता. या योजनेला मिळालेल्या भरगोस प्रतिसादामुळे यात्रेचा दुसरा टप्पा आयोजित करण्यात आला आहे. सोमवार ५ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी या काळात ही यात्रा वसई विरार शहराच्या विविध भागात फिरणार आहे. या योजनेत नागरिकांना तात्काळ आधार कार्ड, आयुष्यान भारत कार्ड उपलब्ध करून दिले जाणार आहे. याशिवाय महिलांना उज्वला गॅस योजना तसेच फेरीवाल्यांना पंतप्रधान स्वनिधी योजनेअंतर्गत कर्जे उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय आरोग्य शिबिरात विविध मोफत तपासणी केली जाणार असून मोफत औषधे दिली जाणार आहेत. वसई विरार महापालिकेचे आयुक्त श्री.अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली योजनेचा पहिला टप्पा आयोजित करण्यात आल्यामुळे नागरिकांची कुठलीच गैरसोय झाली नव्हती. सर्व ठिकाणी परिपूर्ण व्यवस्था कऱण्यात आली होती. यामुळे हजारो नागरिक शासकीय योजनेचा लाभ घेऊ शकले होते.

नागरिकांच्या या प्रचंड प्रतिसादामुळेच केंद्र शासनाच्या निर्देशानुसार दुसरा टप्प्याचे आयोजन वसई विरार शहरात करण्यात आले आहे. यावेळी देखील अशाच पध्दतीने विकसित भारत संकल्प यात्रेचे चांगले नियोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे वसई विरार मधील नागरिकांनी या यात्रेला भेट देऊन शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन या योजनेचे समन्वय अधिकारी आणि उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी केले आहे. यात्रेदरम्यान होणाऱ्या कार्यक्रम स्थळांची माहिति पालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहेत.

—------------------------

<u>पहिल्या टप्प्यात खालील प्रमाणे नागरिकांना लाभ मिळाला होता.</u>

एकूण शिबिरे – ४९

आधार कार्ड - १ हजार ६२०

आयुष्यमान भारत कार्ड - ५ हजार ७४०

पंतप्रधान स्वनिधी कर्जे - ७४९

उज्वला गॅस - ७४२

आरोग्य शिबिरात - ४ हजार ३५७ जणांना लाभ

—------------------------

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**